# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक ०३.१०.२०२६ शनिवार**

## पोलीस भवन, नागपूर शहर येथे ज्येष्ठ नागरीक मेळावा संपन्न :—

दिनांक ०३.१०.२०२६ रोजी पोलीस भवन, ऑडीटोरीयम हॉल येथे मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ नागरीक दिनानिमित्त ज्येष्ठ नागरीक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरीकांच्या आरोग्यविषयक समस्या तसेच ऑनलाईन फसवणुक सायबर विषयक गुन्हे यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मा. सह पोलीस आयुक्त यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून, वेगवेगळ्या विषयावर ज्येष्ठ नागरीकांना समस्यांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमामध्ये मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, श्रीमती विनीता शाहु, श्री. राजेंद्र दाभाडे हे प्रामुख्याने उपस्थीत होते. मेळाव्यामध्ये प्रमुख पाहुणे डॉ. दिपक जेसवानी, क्रिटीकल केअर हॉस्पीटल यांनी ज्येष्ठांच्या आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण करून मार्गदर्शन केले. ॲड. श्री. ऋषीकेश ढाले विधी अधिकारी यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले. श्रीमती रश्मी शर्मा मुख्य व्यवस्थापीका, स्टेट बॅक ऑफ इंडीया व श्री. राजेश कुमार व्यवस्थापक, स्टेट बॅक ऑफ इंडीया, सिव्हील लाईन यांनी ज्येष्ठांना बॅकींग व आर्थीक व्यवहारात उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करून, उपाय व मार्गदर्शन केले. श्रीमती महक स्वामी पोलीस उपायुक्त आर्थिक गुन्हेशाखा यांनी सायबर विषयक गुन्हे व ऑनलाईन फसवणुक या विषयावर मार्गदर्शन केले. मा. पोलीस उपायुक्त वाहतुक शाखा श्री. आदीत्य मिरखेलकर यांनी वाहतुक विषयावर मार्गदर्शन केले.

मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रभाग यांनी मार्गदर्शन व आभार प्रदर्शन करून, कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमाकरीता २०० चे जवळपास ज्येष्ठ नागरीक उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती वर्षा मते पोनि. भरोसा सेल यांनी केले. मेळाव्याचे आयोजन भरोसा सेल गुन्हेशाखा येथील अधिकारी व अंमलदार यांनी उत्तमरित्या करून, मेळावा पार पाडला.






(कामगिरी)

**१) सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.१०.२०२६ चे २२.१० वा. ते दि. ०३.१०.२०२६ चे ०२.०० वा. चे दरम्यान, सिताबर्डी पोलीसांचे तपास पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, पोअं. शत्रुघ्न मुंढे यांना गोपनिय माहीती मिळाली की, द फ्युजन कॅफे, धरमपेठ येथे प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ ग्राहकांना सेवनाकरीता पुरविला जात आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे कॅफे मॅनेजर आरोपी क्र. १) विक्रांत भागवत शिंदे, वय २७ वर्षे, रा. ईसासनी, एमआयडीसी, नागपूर हा १३ ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपीस कॅफे मालकाबाबत विचारणा केली असता, त्याने आरोपी क्र. २) मयंक गौरीशंकर अग्रवाल, वय ३८ वर्षे, रा. न्यु नंदनवन, नागपुर हा असल्याचे सांगीतले. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का व ईतर साहित्य असा एकुण ४८,९९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेमालक व मॅनेजर आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी येथे कलम ४,५,२१ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम—२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम—२०१८.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) श्रीमती विनिता शाहु, मा. पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २) श्रीमती अन्नपुर्णा सिंग, मा. सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) श्री. सुनिलसिंग पवार व वपोनि. श्री. सुहास राऊत यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. मनिष कोल्हटकर, सपोनि. चंद्रकांत ममताबादे, पोउपनि. देवानंद बगमारे, पोहवा. नंदकिशोर वालदे, पोअं. शत्रुघ्न मुंडे, चेतन शेंडे, नैनिश तलवारे, सचिन भोयर, मपोहवा. रूपाली मोतीकर, माधुरी सावदे व मपोअं. रश्मी टेकाम यांनी केली.



**२) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे २०.३० वा. ते दि. ०३.०८.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट नं. ३५, विश्वभारती, कामठी रोड, नागलोक, भिलगांव, नागपूर येथे राहणारे फिर्यादी प्रकाश तुलशिदास भौतकर, वय ५२ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन, आपले ड्युटीवर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे कम्पाऊंडची भिंत ओलांडुन किचनरूमचे दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील टेबलवर ठेवलेला पिप्रो नोटबुक लॅपटॉप किंमती २०,०००/—रू. चा चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी दिनेश बिसन कुंमरे, वय ३८ वर्षे, रा. गोंड मोहल्ला, कांद्री माईन्स, मनसर, तह. रामटेक, जि. नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे रोशन समुद्रे, रा. हुडकेश्वर, नागपुर याचेसोबत संगणमताने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन ०१ रियलमी कंपनीचा मोबाईल किंमती १५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचॉद शेख व त्यांचे पथकातील अधिकारी/अंमलदार यांनी केली.

**३) वाठोडा पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना ०६ तासात अटक.**

दिनांक ०२.१०.२०२६ चे १९.३० वा. ते २१.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी सौरभ शत्रृघ्न परताडे, वय २७ वर्षे, रा. रोहा, तह. मोहाडी, जि. भंडारा. ह.मु.— गांधीबाग, नागपुर यांना मोबाईल फोनवरील ॲपवरून फ्रेन्ड रिक्वेस्ट आल्याने, त्यांनी अनोळखी ईसमासोबत चॅटींग केली असता, त्याने त्यांना बहादुरा फाटा येथे बोलाविले असता, फिर्यादी हे तेथे गेले. तेथे आलेल्या अनोळखी ईसम व त्याचा सोबती यांनी फिर्यादीस जबरीने पल्सर गाडीवर बसवुन, निर्जनस्थळी घेवुन गेले व मारहाण करून, गुगल—पे वरून ५,०००/—रू. आपले अकाऊंटमध्ये ट्रान्सफर करायला फिर्यादीस भाग पाडले. तसेच, फिर्यादीचे एटीएम कार्ड द्वारे ३०,०००/—रू. रोख काढायला लावुन, फिर्यादीचा मोबाईल व रोख असा मुद्देमाल घेवुन पळुन गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे आरोपींविरूध्द कलम ३०९(६),१२७(२),३५१(३),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे तपासात वाठोडा पोलीसांनी त्वरीत दखल घेवुन, तांत्रीक तपास करून, आरोपी नामे १) अंतरीक्ष उर्फ आशु संतोष मिश्रा, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. १, शिर्डी नगर, हुडकेश्वर, नागपुर २) अमित उर्फ भुऱ्या मनोज पाटील, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. १९४, जयहिंद नगर, हुडकेश्वर, नागपुर यांना निष्पन्न करून, सापळा रचुन ताब्यात घेतले. आरोपींना विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना ०६ तासाचे आंत अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रमोद पोरे, सपोनि. संतोष सपाटे, पोउपनि. अतुल पवार, पोहवा. अनुप तायवाडे, पोअं. वामन कालेकर, ईश्वर राठोड, सिताराम चव्हाण व विपीन पिल्लेवान यांनी केली.



**४) पारडी पोलीसांची कामगिरी :— दारुची अवैध वाहतुक करणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल, एकुण ७,५५,४६०/— रु. चा मुद्देमाल जप्त.**

दिनांक ०१.१०.२०२६ चे १२.३० वा. ते १२.४० वा. चे दरम्यान, पारडी पोलीसांचे तपास पथकातील पोहवा. पप्पु यादव यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, नागपूर—भंडारा रोडने एका लाल रंगाचे बलेनो कार क्र. एम.एच ४३ बि.एन ४४५२ मधुन दारूसाठ्याची अवैध वाहतुक केली जात आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, नागपूर—भंडारा रोडवरील सुरूची कंपनीजवळ सापळा रचुन, प्राप्त वर्णनाची बलेनो कार दिसुन आल्याने तिला थांबविले. पंचासमक्ष वाहनचालकाचे नाव पत्ता असता, त्याने त्याचे नाव निलेश चंदनलाल जैस्वाल, वय ५५ वर्ष, रा. प्लॉट क्र. १४, मेहंदीबाग, वैशाली नगर, पाचपावली, नागपूर असे सांगितले. त्याचे ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता, त्यामध्ये मास्टर डिलाईट व्हिस्की, रॉयल स्टेज व्हीस्की, इम्पेरियल ब्ल्यु व्हीस्की, ट्युबर्ग स्ट्रॉग बियर अशा वेगवेगळ्या कपंनीचा विदेशी दारूसाठा मिळुन आल्या. आरोपीचे ताब्यातुन नमुद दारुसाठा व बलेनो कार असा एकुण ७,५५,४६०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे पारडी येथे कलम ६५(अ)(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) व वपोनि. श्रीमती नंदा मनगटे यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. अरविंद कोल्हारे, पोहवा. पप्पु यादव, शैलेष कुंभलकर, पोअं. प्रसेनजित जांभुळकर, धनराज उमरेडकर, चंद्रशेखर मुटकुरे, राकेश वासनिक व प्रदीप ढोरे यांनी केली.

**५) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.१०.२०२६ चे २३.३० वा. सुमारास, फिर्यादी शुभम बापु चौधरी, वय ३० वर्षे, रा. पांढरबोडी, संजय नगर, माता मंदीर जवळ, नागपुर हे त्यांचा मच्छीफ्राय ठेला बंद करून, घरी जात असतांना, संजय नगर, पांढराबोडी येथे आरोपी शाम उर्फ अण्णा अनिल नायडु, वय २५ वर्षे, रा. हजारीपहाड, गिट्टीखदान, नागपुर याने फिर्यादीस अडवुन, ''तु मुझे अभी के अभी पाच हजार रूपये दे, नही तो मै तुझे देख लुंगा'' असे म्हणुन त्याचे जवळील चाकु काढुन, धाक दाखवुन, जबरीने पैसे घेण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने आरडा—ओरड केला असता, लोक जमा झाल्याने, आरोपी तेथुन पळुन गेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपींविरूध्द कलम ३०९(५),३१२ भा.न्या.सं., सहकलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हयाचे तपासात अंबाझरी पोलीसांनी त्वरीत दखल घेवुन, तांत्रीक तपास करून, आरोपीचा शोध घेवुन आरोपीस सुदाम नगरी येथील ग्रीन जीम येथुन ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कमरेत लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती २००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीला विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. विनोद गोडबोले, पोउपनि. नंदकिशोर पदकोंडे, राजेश लोही, पोहवा. लक्ष्मीकांत आखाडे, राज तायडे, पोअं. प्रविण लोखंडे, अमित तिवारी व कमलेश ननेर यांनी केली.

**६) नविन कामठी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०३.१०.२०२६ चे ०४.५५ वा. ते ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नविन कामठी येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करित असता त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीतील पारशीपुरा मैदान जवळील कळमना रोड येथे पाळत ठेवून एका ग्रे रंगाच्या ॲक्टीवा वाहन क्र. एम.एच ३१ एफ.व्ही ८४२७ वरील इसमास थांबवुन, पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शुभम सुरेश ढाकुलकर, वय ३० वर्षे, रा. अम्मादर्गाह जवळ, दिघोरी, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन एका झिपलॉक पन्नीत एकुण ३.९० ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीस विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार नामे शिवम उर्फ दद्दु दिगांबर गजभिये, वय २८ वर्षे, रा. श्रीराम नगर झोपडपट्टी, वाठोडा ले—आऊट, खरबी रोड, नागपुर याचे कडुन आणल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, रोख २,५००/—रू., ०१ मोबाईल व ॲक्टीवा मोपेड असा एकुण ८२,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीचा साथीदार याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले. दोन्ही आरोपींना अधिक विचारपुस केली असता, आरोपी क्र. १ चा भाऊ नामे रोहन सुरेश ढाकुलकर, वय २९ वर्षे हा सुध्दा एम. डी पावडर विक्री करीत असल्याचे माहीती प्राप्त झाल्याने, त्याची माहीती काढुन, त्यास त्याचे साथीदार आरोपी समीर अरूण काळे, वय २५ वर्षे, रा. इंद्रायणी नगर, दत्तवाडी, नागपुर व मोहसिन खान सरदार खान, वय ३६ वर्षे, रा. रामगड, नविन कामठी, नागपुर यांना स्वीफ्ट कार क्र. एम.एच. २० ई.जे ८६६५ सह ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात ३.१५ ग्राम एम.डी पावडर मिळुन आली. त्यांचे ताब्यातुन एम.डी पावडर ०५ मोबाईल फोन व स्वीफ्ट कार जप्त करण्यात आली.

आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नविन कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींचे ताब्यातुन एकुण ५,८७,७५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे प्रभाग) नागपूर शहर मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. रामेश्वर कायंदे, पोउपनि. योगेश नाल्टे, अक्षय झगडे, सफौ. किशोर महंत, पोअं. विवेक, सुरज, तुषार, आशिष व आकाश यांनी केली.



**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सोनेगांव :—** दिनांक ०३.१०.२०२६ चे १२.०९ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत एअर इंदमार प्राय. लिमीटेड, मिहान, नागपुर कंपनीतील रन—वे चौकीजवळील गेटजवळ अभिषेक सुखदेव सांगोडे, वय २५ वर्षे, रा. प्रतीभा लॉन जवळ, कळमना, नागपुर हे व त्यांचे सोबत कैलास पुंडलीकराव चाफेकर, वय ४६ वर्षे, रा. हिंगणा देवरी, नागपुर हे दोघे हॅंगर या ठिकाणी सेक्युरिटी गार्ड कामावर कार्यरत होते. विमान पास झाल्याने रन—वे चौकी गेट बंद करीत होते. फिर्यादी व एक प्रशिक्षणार्थी गेटचे अलीकडे व कैलास चाफेकर व दुसरा प्रशिक्षणार्थी गेटचे पलीकडे उभे होते. गेट बंद करण्याकरीता ढकलले असता, गेट लॉक न झाल्याने गेट पलीकडील कैलास व प्रशिणार्थी यांचे अंगावर पडले. ईतर कर्मचारी यांनी गेट बाजुला करून, त्यांना बाहेर काढले असता, कैलास चाफेकर हे गंभीर जखमी, बेशुध्द अवस्थेत व प्रशिणार्थी हे जखमी अवस्थेत दिसुन आले. त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी कैलास चाफेकर यांना तपासुन मृत घोषीत केले. जखमी प्रशिक्षणार्थीचा उपचार सुरू आहे.

यापकरणी फिर्यादी अभिषेक सुखदेव सांगोडे, यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे पोउपनि. विक्रांत कारटकर ७२७६२०९५३५ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :—** फिर्यादी सौ. संगीता दिलीप गावंडे, वय ४५ वर्षे, रा. खपरी पुनर्वसन, सेक्टर २७, बेलतरोडी, नागपुर यांनी पोलीस ठाण बेलतरोडी येथे तक्रार दिली की, त्यांचे पती नामे दिलीप बाबुराव गावंडे, वय ४८ वर्षे हे दिनांक ०६.०९.२०२६ चे ०९.३० वा. पासुन घरगुती वादावरून कुठेतरी निघुन गेले. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ६ इंच, केस—काळे, डोळे— काळे, अंगात— निळा शर्ट व काळा पॅन्ट घातलेली आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात. सोबत निळी बॅग घेवनु गेले आहे. कोणीतरी अज्ञात ईसमाने त्यांना फुस लावुन पळवुन नेले असावे अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



दिलीप

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ३, नागपुर. | २०६६/ २०१६ | कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४४७, ३४ भा.दं.वि. | सय्यद अहमद पापा मिया, रा. शनि मंदीर जवळ, अयोध्या नगर, नागपुर. | ०८.१०.२०२६ |

स्वा/—

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.

**प्रसिध्दी पत्रक**

**दिनांक १५/०९/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर नोटीसीच्या अनुषंगाने मुदतवाढीबाबत..**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालया मार्फत दिनांक १५/०९/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिर नोटीसीमध्ये सन २०२६ च्या दिवाळी निमित्त फटाका विक्री करण्यासाठी तात्पुरता फटाका परवाना प्राप्त करू इच्छिणाऱ्या इच्छुकांसाठी विहित नमुन्यातील अर्जाचे फॉर्म दिनांक १६/०९/२०२६ ते दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत सबंधित पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र.१, २, ३, ४, ५, व ६ यांच्या कार्यालयातून उपलब्ध करून देण्यात येतील, असे नमुद करण्यात आले होते.

तथापि, इच्छुक अर्जदाराची सोय व अधिकाधिक अर्जदारांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सदर अर्जाचे फॉर्म उपलब्ध करून देण्याची मुदत आता **दिनांक १०/१०/२०२६** पर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यामुळे सन २०२६ च्या दिवाळी निमित्त फटाका विक्रीसाठी तात्पुरता फटाका परवाना प्राप्त करून इच्छिणाऱ्या इच्छुकांनी दिनांक १०/१०/२०२६ पर्यंत सबंधित पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र.१, २, ३, ४, ५, व ६ यांच्या कार्यालयातून विहित नमुन्यातील अर्जाचे फॉर्म प्राप्त करून घ्यावेत.

अर्जासाबत जाहिर नोटीसीमध्ये नमुद केलेली आवश्यक कागदपत्रे जोडून अर्ज विहित मुदतीत सादर करावा. **दिनांक १०/१०/२०२६ नंतर अर्जाचे फार्म उपलब्ध करून दिले जाणार नाहीत / प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही,** याची सर्व सबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच दिनांक १५/०९/२०२६ रोजीच्या जाहिर नोटीसीतील इतर सर्व अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच लागु राहतील.

फटाका विक्रेत्यांनी फटाका विक्री व साठवणुकीबाबत शासन, पोलीस विभाग, अग्निशमन विभाग व सबंधित प्राधिकरणांनी घालुन दिलेल्या सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

( नविनचंद्र रेड्डी )

सह पोलीस आयुक्त

नागपूर शहर